# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२८७/२०१०/१४

तक्रार दाखल दिनांक :- १७/०५/२०१०
निकाल दिनांक :- ०२/०७/२०१०

श्री वसंत गोपाळराव चौकेकर,
घर नंबर १-२-२५ शीतलामाता गल्ली,
बेगमपुरा,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१०३९९५०२) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | विष्णु अं. हंबिरे | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्य/सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १७/०५/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०३/०६/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१०३९९५०२ असा आहे.ग्राहकाने महावितरण कंपनीकडे सुरक्षा ठेव म्हणुन रुपये १३८०/- चा भरणा केलेला आहे.ग्राहकाचे वीज बिलातुन माहे नोव्हेंबर २००८ पर्यंत रुपये १३८०/- सुरक्षा ठेव भरल्याची नोंद होत होती.माहे डिसेंबर २००८ मध्ये अचानकपणे वीज बिलामध्ये सुरक्षा ठेव रुपये १००/- जमा असत्याची नोंद महावितरण कंपनीकडुन करण्यात आली.तसेच ग्राहकास रुपये ४५०/- जास्तीची अनामत रक्कम भरण्याबाबत वीज बिल देण्यात आले. वरील बाबतीत ग्राहकाने महावितरण कंपनीच्या पावर हाऊस उपविभाग औरंगाबाद येथे दिनांक ०५/०५/२००९ रोजी लेखी तक्रार दाखल करुन वीज बिलामध्ये रुपये १३८०/- सुरक्षा ठेव असल्याची नोंद करण्याबाबत विनंती केली. ग्राहकाने त्यांच्या सुरक्षाठेवीवर नियमाप्रमाणे व्याज मिळत नसत्याबाबत आपल्या तक्रारीमध्ये उल्लेख केलेला आहे. परंतु त्यांच्या तक्रारीवर महावितरण कंपनीने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी या मंचात तक्रार दाखल करुन सुरक्षा ठेव रुपये १३८०/- जमा असल्याबाबत चा उल्लेख वीज बिलामध्ये करावा,जादा सुरक्षा ठेव रुपये ४५०/- भरण्याबाबत चे देयक रद्द करावे व जमा सुरक्षा ठेवीवर नियमाप्रमाणे व्याज देण्याबाबत आदेश महावितरण कंपनीस देण्याची विनंती मंचास केली.

२) वरील तक्रारीची सुनावणी दिनांक ०३/०६/२०१० व ०८/०६/२०१० रोजी ठेवण्यात आली सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी श्री भारती व श्री पत्तेवार सहाय्यक लेखापाल व वीज ग्राहक उपस्थित होते. ग्राहकाने आपली तक्रार वरील प्रमाणे कथन केली. नोडल अधिकारी यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार संगणक विभागात ओरॅकल प्रणालीमधील झालेल्या बदलामुळे ग्राहकाची सुरक्षा ठेव माहे डिसेबर २००८ पासुन वीज बिलावर कमी दाखविल्याचे मान्य केले. ग्राहकाच्या तक्रारीवरुन योग्य सुरक्षा ठेव वीज बिलावर छापण्याबाबत संगणक विभागास कळविण्यात आले असुन त्यानुसार माहे जुन २०१० च्या वीज बिलावर ग्राहकाने भरणा केल्याप्रमाणे रुपये १३८०- सुरक्षा ठेव जमा असल्याचे दाखविण्यात आले आहे. त्याबाबत त्यांनी माहे जुन २०१० च्या वीज देयकाची प्रत मंचात सादर केली. तसेच जास्त सुरक्षा ठेव रुपये ४५०/- चे देयक रद्द केल्याचे सांगीतले. ग्राहकास माहे जुन २०१० नंतर कंपनीच्या नियमाप्रमाणे त्यांच्या सुरक्षा ठेवीवर व्याजाची रक्कम जमा दाखविण्यात येईल असे प्रतिपादन केले.दोन्ही बाजुचे म्हणने ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवले.

३) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाने महावितरण कंपनीकडे रुपये १३८०/- सुरक्षा जमा केली आहे ज्याचा उल्लेख माहे नोव्हेबर २००८ पर्यत देण्यात आलेल्या वीज देयकात योग्य रितीने केलेला आहे.परंतु माहे डिसेंबर २००८ नंतर अचानकपणे वीज देयकामध्ये रुपये १००/- सुरक्षा ठेव जमा असल्याबाबत उल्लेख करण्यात आला. तसेच ग्राहकाची सुरक्षा ठेव कमी असल्याचे कारण दर्शवीत त्यांच्याकडे रुपये ४५०/- जादा सुरक्षा ठेव भरण्याबाबत देयक देण्यात आले.ग्राहकाने वरील बाबतीत लेखी तक्रार दाखल करुनही त्याची दखल घेण्यात आली नाही. ग्राहकाने मंचात तक्रार दाखल केल्यानंतर मात्र महावितरण कंपनीने मंचाच्या आदेशानुसार ग्राहकाने भरणा केल्याप्रमाणे सुरक्षा ठेव रुपये १३८०/- ग्राहकाच्या वीज बिलावर जमा दाखविली तसेच जादा सुरक्षा ठेव रुपये ४५०/- देयक रद्द केले.ग्राहकाच्या सी.पी.एल.चे माहे जानेवारी २००८ पासुन चे निरिक्षण केले असता असे दिसुन येते की

त्यांच्या जमा सुरक्षा ठेवीवर व्याज देण्यात आलेले नाही. भा.विद्युत कायदा २००३ चे कलम ४७ (४) नुसार वितरण परवाने धारकास ग्राहकाचे जमा सुरक्षा ठेवीवर वर्षातुन एकदा भारतीय रिझर्व बॅकेने घोषीत केलेल्या व्याज दरानुसार व्याज देणे बंधनकारक आहे.वरील बाब मा.वीज नियामक आयोगाने विनियम २००५ चे कलम ११.११ मध्ये सुध्दा स्पष्ट केली आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास त्याचे जमा सुरक्षा ठेव रक्कम रुपये १३८०/- वर नियमाप्रमाणे सन् २००८ पासुन व्याज द्यावे.

२) व्याजाची रक्कम माहे जुलै २००९ च्या देयकामध्ये स्वतंत्रपणे दाखवुन वीज देयक वितरीत करावे.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |